**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दिनांक १५ ऑगस्ट २०१८**

**जेलरोड पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ३४०/२०१८ भादविसक ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | १३/०८/२०१८ रोजी २२.३० वा फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १४/०८/२०१८ रोजी ०४.४४ वा |
| **फिर्यादी** | : | बालाजी प्रभाकर शेराज वय-२३, रा.घ.नं.२ मदा झोपडपट्टी अशोक चौक सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | १.पवन पुल्ली २.आकाश शिंदे ३.राहुल कंदलगावकर |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे राहते घरी असताना नमुद आरोपी त्याचे ग्राफिक्सचे काम न केल्याचा मनात राग धरून फिर्यादीचे राहते घरासमोर येवून तु आम्हाला ओळखत नाही का,मला फोन केला नाही,तु आमचे काम करत नाही का तुला या एरियात धंदा करायचा का नाही असे म्हणुन शिवीगाळ मारहाण करत असताना फिर्यादीचे ओरडण्याचा आवाज ऐकुन फिर्यादीचा भाऊ नामे राजशेकर व लक्ष्मण तसेच आई अनुसया असे सोडविण्यासाठी आले असताना त्याना ही हाताने मारहाण केली असुन आरोपी क्रं.१ याने खाली पडलेली विट उचलुन फिर्यादीस मारण्यासाठी येत असताना फिर्यादीचा भाऊ राजशेखर हा मध्ये असता त्याचे डोकीस सदरची विट लागली आहे.म्हणुन **तपास:-पोना/३९९ दुधाळे** |

**जोडभावी पेठ पोलीस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ३९६/२०१८ भादविसक ३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | ०७/०३/२०१८ रोजी २३.०० ते २६/०६/२०१८ रोजी ११.०० वा घ.नं.७४ शेळगी गावठाण तलाठी ऑफिसचे बाजुला सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १४/०८/२०१८ रोजी ०१.११ वा |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : | सौ.शमशाद बंदेनवाज शेख वय-३६,व्यवसाय-घरकाम रा.सदर |
| **आरोपीचे नांव** | : | १. बाशा ईस्माईल शेख २.जहारा बाशा शेख ३.आझाद बाशा शेख ४.शाहीन बाशा शेख रा.जोशी गल्ली सुरवसे वाडा शेळगी सोलापूर |
| **गेला माला** | : | १६,६००/-रू घरगुती साहित्य |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी राहते घराचे आतील खोलीस कुलूप लावून गेली असता नमुद आरोपी मजकुर यांनी राहते घराचे कुलूप काढुन आत प्रवेश करून घरातील सर्व घरगुती साहित्य फिर्यादीचे संमत्तीशिवाय चोरून नेली म्हणुन **तपास:-पोसई/दाईगडे** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ३९८/२०१८ भादविसक ४९८(अ),५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ ठिकाण** | : | २९/०४/२०१८ रोजी लग्न झाल्यानंतर सुमारे ०१ महिन्या पासुन ते ०८/०८/२०१८ रोजी २०.४५ वा फिर्यादीचे सासरी मुक्ता रेसीडेन्सी आयरीश अपार्टमेंट बी/२ रू.नं.५०१ पडलेगांव बस स्टॉप जवळ शिळफाटा रोड कल्याण |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १४/०८/२०१८ रोजी १७.१२ वा |
| **फिर्यादी** | : | सौ.कोमल नितीन ढाले वय-२२ व्यवसाय-गृहिणी सध्या रा.८३ मड्डी वस्ती भावानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | १.पती-नितीन रविंद्रनाथ ढाले वय-२९ २.सासु-छाया रविंद्रनाथ ढाले वय-४५ ३.सासरे-रविंद्रनाथ भानुदास ढाले वय-५० ४.दिर-सुनिल रविंद्रनाथ ढाले वय-२५ ५.पतीचे मामा-तानाजी शिवाजीराव वडवे वय-३५ रा.भोसरी पुणे |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील आरोपी मजकुर यांनी संगणमत करून फिर्यादीस तुझ्या माहेरच्या लोंकानी लग्नात आमचा मनाप्रमाणे मानपान केला नाही आम्हाला कार घ्यावयाची आहे त्याकरीता ४,००,०००/-रू कमी पडले आहेत ते तुझ्या माहेरहून घेवून ये म्हणुन फिर्यादीस लग्न झाल्यापासुन घालूनपाडुन बोलुन उपाशी पोटी ठेवुन जाचहाट व छळ केला आहे. फिर्यादीचे पतीने लग्न झाल्यापासुन कोणत्याही प्रकारचे पती या नात्याने शरीरसुख दिले नसुन त्यांनी शिवीगाळ व दमदाटी करून फिर्यादीचे अंगावरील |

| | | |
|---|---|---|
| | | सोन्याचे दागिने काढुन घेवुन घरातुन हाकलुन दिले म्हणुन **तपास:-सफौ/माने.एस** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गुरनं. व कलम** | : | ५१८/२०१८ भादविसक ३७९,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ .ठिकाण** | : | ०७/०८/२०१८ रोजी १६.४५ ते १८.१५ वा लोकमंगल सुपर बझार महापौर बंगल्याजवळ सोलापूर |
| **गु. दा. ता.वेळ** | : | १४/०८/२०१८ रोजी २३.१० वा |
| **फिर्यादी** | : | सागर कृष्णात कासार वय-२५,व्यवसाय-नोकरी रा.निर्वाणी यांचे वाड्यात भाड्याने जनावरंचा दवाखान्याचे मागे मित्र नगर शेळगी सोलापूर |
| **आरोपीचे नांव** | : | १. संतोष नाईक २.रणजित हिरवे |
| **गेला माला** | : | २,५८,४८०/-रू रोख़ रक्कम |
| **हकिकीत** | | यात हकीकत अशी की, बाजुस नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, यातील लोकमंगल मल्टिइस्टेट को.ऑ.सोसायटी सोलापूर प्रकल्प कुमठे येथील भरणा झालेली नमुद रक्कम लोकमंगल सुपर बझार महापौर बंगलाजवळ सोलापूर येथील आरोपी क्रं.१ यांचे टेबलाजवळ ठेवलेल्या फिर्यादीचे बॅगेतील रक्कम हि नमुद आरोपी मजकुर यांनी चोरल्याचा फिर्यादीचा संशय आहे म्हणुन **तपास:-पोसई/जंगम** |